केसरी पुणे, ४ ऑक्टोबर २०१८

# 'फ्लायिंग यंगस्टर्स'तर्फे स्वच्छता मोहीम



**पुणे :** पंख व क्विकहिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शाळांगण प्रकल्पांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या हुतात्मा राजगुरू विद्यालयाच्या सहकार्याने या शाळेमधील 'फ्लायिंग यंगस्टर्स' गटामार्फत मारुती मंदिर परिसर, वडारवाडी येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी परिसरातील कचरा उचलून परिसर स्वच्छ केला. विद्यार्थ्यांनी स्त्री शिक्षणावर पोवाडा सादर केला, तर पंख संस्थेच्या समुपदेशकांनी स्वच्छतेवर आधारित पथनाट्य सादर केले.

क्विकहिल फाऊंडेशनचे संचालक कैलास काटकर अध्यक्षस्थानी होते. महापौर मुक्ता टिळक प्रमुख पाहुण्या या होत्या. क्विकहिल फाउंडेशन सी.एस.आर प्रमुख अजय शिर्के, पंख संस्था अध्यक्ष स्मिता आपटे, कल्याणी भाबड, मैथिली बंडी, राम म्हेत्रे यावेळी उपस्थित होते. महापौरांनी स्वच्छता अभियानाचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, रोगराईला आळा घालण्यासाठी अशा कार्यक्रमांची गरज आहे. सूत्रसंचालन कल्याणी भाबड यांनी केले. अजय शिर्के यांनी आभार मानले, कार्यक्रमाचे नियोजन पंख संस्थेचे समुपदेशक कौस्तुभ जोगळेकर व श्वेता सूर्यवंशी यांनी केले.